९) विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने अधिकच्या (दुस-या / चौथ्या) तुकड्यांना संलग्नता मिळण्याकरिता सुधारित ट्रेनिंग मॅन्युअल २००२ प्रमाणे अॅनेक्चर ३ व ३ ए तक्त्यांमध्ये माहिती भरुन (स्थानिक स्थायी समितीतर्फे निरीक्षण करुन) अहवाल (DIR) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांचेकडे सादर करण्यांत यावा. त्यांनी पूर्व निरिक्षण अहवाल (PIR) सादर करण्याची आवश्यकता नाही. नथापि नवीन व्यवसाय / तुकडी (पहिली व दुसरी/ तिसरी व चौथी ) असल्यास स्थायी समिती निरीक्षण होण्यापूर्वी पूर्वनिरीक्षण अहवाल (PIR) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करण्यांत यावेत. (संबंधित व्यवसायाच्या दोन्ही तुकडयांचा एकत्रित)

१०) तसेच संस्थेने संलग्नतेबाबत मानकानुसार पूर्तता केल्याबाबतचे दि. १८ एप्रिल,२०११ पूर्वी संबंधित सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना लेखी कळविल्यानंतर आपल्या संस्थेचे तात्काळ पूर्वनिरीक्षण करुन स्थायी समितीचे निरीक्षण करण्यांत येईल व याबाबतीत काही अडचणी निर्माण झाल्यास मार्गदर्शनासाठी संबंधित सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय / जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेशी संपर्क साधून निवारण करुन घेण्यात यावे.

११) सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या करिता शासन निर्णय क्र.आयटीआय-२००८/रिट/(२७/०८)/व्यशि-२, दि. ३१ मार्च, २००८ नुसार सुधारित प्रशिक्षण शुल्क लागू राहील.

१२) प्रत्येक व्यवसायासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रत, लागणारी जागा, इमारत, यंत्रसामुग्री, टूल कीटस्, विद्युत पुरवठा व कर्मचारी वर्ग इ. बाबतची मानके संबंधित संस्थेस सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय / जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयातून उपलब्ध होतील. ही मानके अर्जासोबत असलेल्या माहिती पुस्तिकेतही आहेत. याबाबत सर्व साधन सुविधांची निरीक्षणांसाठी तयारी करण्यात यावी.

१३) संलग्नतेकरिता सामोरे जातांना केंद्रास परवानगी मिळालेल्यचा दुसऱ्या / चौथ्या तुकडीकरिता स्वतंत्र शिल्प निदेशकाची नेमणूक करावी. पहिल्या तुकडीला शिल्पनिदेशक जर एन.सी.व्ही.टी. ही शैक्षणिक अर्हता धारण करित असेल तर दुसऱ्या तुकडीकरिता संबंधित मान्यताप्राप्त शाखेची पदवी / पदविका धारक असणे आवश्यक आहे.

१४) डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या सुधारित निदेशानुसार नविन व्यवसाय / तुकडयांच्या संलग्नतेकरिता जुनी मशीनरी असल्यास संस्थांचे स्थायी समिती निरिक्षण होवू शकणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या संस्थेला नवीन व्यवसाय/जादा तुकडीसाठी शिफारस करण्यांत आलेली आहे, अशा व्यवसाय अभ्यासक्रमासाठी मानकानुसार दि. ३० एप्रिल, २०११ पूर्वी पूर्व निरीक्षण करुन संबंधित सहसंचालक, प्रादेशिक कार्यालयामार्फत संचालनालयास पुर्व निरीक्षण अहवाल सादर करण्यांत यावा. तसेच दुस-या / चौथ्या तुकडीकरिता विभागीय निरीक्षण करुन निरीक्षण अहवाल (DIR) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालयामार्फत संचालनालयास दि. ३० एप्रिल २०११ पुर्वी सादर करण्यांत यावेत.

**परवानगी दिलेले नवीन व्यवसाय / जादा तुकडी**

**रंगारी जनरल - अति.१ तु. (१+१) २ री.**

( ज.द. भुतांगे )
**संचालक (प्रशिक्षण)**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई- ४०० ००१.**

जा.क्र.कार्यासन क्रमांक क-३/ 4102

दिनांक :- 25 APR 2011

प्रति :- ~~प्राचार्य~~ / अध्यक्ष, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संचालनालयाच्या उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे कालमर्यादेत कार्यवाही करावी.

प्रत :- जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

**सहसंचालक,**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, घोले रोड,
पुणे - ४११ ००५.